**शासकीय दूग्धशाळा/शितकरण केंद्र सहकारी दूध संघाकडे हस्तांतरीत किंवा विक्री करणेबाबत........**

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.एमएलके-२००१/प्र.क्र.३७६/२००१/पदुम-१०,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२
दिनांक : ११ नोव्हेंबर,२००२

वाचा:- १) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग
क्र.ओएफपी-१०८९/५०९३१/ सीआर-३७३/८९/पदुम-१०, दिनांक- ४.३.९१.
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग
क्र.ओएफपी- १०८९/५०९३१/सीआर-३७३/८९/पदुम-१०, दिनांक- १४.३.९१.
३) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र.ओएफपी- १०९५/२३३२२/पदुम-१०,
दि. १३.३.९७.

प्रस्तावना -

शासनाने दिनाक १४.५.१९८१ रोजी भारतीय दुग्ध विकास निगम बरोबर करारनामा केल्यानंतर दूध महापूर-२ योजना राबवितांना निगमकडून वित्तीय सहाय्य मिळविण्याच्या संबंधात काही अडचणी आल्या. या कार्यक्रमाखाली आणखी कोणताही निधी उपलब्ध केला जाण्यापूर्वी शासकीय दुग्धशाळा जिल्हा सहकारी दूध संघाकडे हस्तांतरीत केल्या जाव्यात अशी अट भारतीय दुग्ध विकास निगमने घातली होती. मंत्रिमंडळाच्या दिनांक ११.८.८८ रोजीच्या बैठकीत शासकीय दुग्धशाळा/ शितकरण केंद्रे सहकारी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्याबाबत मंत्रिमंडळ उपसमितीची नियुक्ती केली. या समितीने अहवाल सादर केल्यानंतर, त्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने दिनाक २३.१.९० रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील शासकीय दुग्धशाळांच्या सहकारी करणाबाबत जो निर्णय घेतला तो खालीलप्रमाणे आहे :-

अ) राज्यातील शीतकरण केंद्र हे जे तालुका व जिल्हा सहकारी दूध संघ स्विकारण्यास तयार असतील त्यांना हस्तांतरीत करण्यात यावेत.

ब) शासकीय दुग्धशाळा,दूध भूकटी कारखाने इ.महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाकडे हस्तांतरीत करण्यात यावेत.

दुग्धशाळा/शितकरण केंद्र हस्तांतरणाबाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णय दि.४.३.९१ अन्वये निश्चित करण्यात आल्या. या निर्णयाप्रमाणे दुग्धशाळा/शीतकरण केंद्राचे सहकारी क्षेत्राकडील हस्तांतरण दि. १/४/९१ पासून म्हणजे सहकारी वर्षाच्या पहिल्या दिवसापासून अंमलात येणार होते. तथापि शासन निर्णय दिनांक १४.३.९१ अन्वये "दुग्धशाळा सहकारी क्षेत्राकडील हस्तांतरण शासन ठरविल त्या दिनांकापासून अंमलात राहील" अशी दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे त्यानंतर या दुग्धशाळांचा सहकारी क्षेत्राकडील हस्तांतराचा प्रश्न स्थगित राहीला.

२. शासकीय दुग्धशाळा/शितकरण केंद्रे सहकारी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्याचा शासन निर्णय दि. ४.३.९१ अन्वये घेण्यात आलेला निर्णय जरी स्थगित राहिला, तरी त्यानंतर मंत्रिमंडळाच्या दिनांक १४.१.९४ रोजी झालेल्या बैठकीत संगमनेर व बारामती येथील दुग्धशाळा संगमनेर तालुका दूध संघ व बारामती तालुका दूध संघ यांना लिजवर देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शासन निर्णय दिनांक